MHST090008442021

## नि.दि.दा.क्र. १३१/२०२१ निशाणी क्र. ३४ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ विरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व आदेश ३८ नियम ५ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादीचे चुलत आजोबा श्रीपती बहिरु माळी यांनी बनुबाई कोम हरी माळी हिच्याकडून दिनांक १७/०८/१९२० रोजी नोंदणीकृत खरेदीदस्ताने घेतली. सदर मिळकतीबाबत पिलू ताटे, वसंत ताटे, वादीचे वडील खाशाबा गोविंद शिंदे व चुलत आत्या तानुबाई कृष्णा फरांदे यांच्यामध्ये दावा झाला होता. सदर दाव्यात अपील नं. १८८/१९७५ झाले होते व त्याचा अंतिम निकाल वादीच्या बाजूने झाला आहे. वसंत ताटे याचा भाऊ शिवाजी जगताप हा महसूल खात्यामध्ये नोकरीस असल्याने त्याने मालकी हक्काबाबतचे दत्तकपत्र अथवा कोणताही पुरावा नसताना ग्रामपंचायत व सिटी सर्व्हेला नोंद करुन घेतली. प्रतिवादी नं.२ हिस त्याने दावा मिळकत हस्तांतरीत केली. त्यानंतर प्रतिवादी नं.२ हिने बिनभरणा, पोकळस्त व बिन कब्जाचा खरेदीदस्त प्रतिवादी नं.१ यास लिहून दिला. प्रतिवादी नं.१ यास दावा मिळकतीत कोणताही हक्क व अधिकार प्राप्त झालेला नाही. महसूल खात्यातील चुकीच्या व बेकायदेशीर नोंदीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी नं.१ याने दावा मिळकत हस्तांतरण करुन दाव्याच्या कामी गुंतागुंत केली असून वादीस न्यायापासून वंचित ठेवले आहे. तसेच वादीचे

आर्थिक नुकसान करत आहे. त्यामुळे वादीने अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी नं.१ यास न्यायालयात रक्कम रुपये १०,००,०००/– अनामत रक्कम भरण्याचा आदेश देण्यात यावा व सदर रक्कमेचा बोजा दावा मिळकतीवर ठेवण्यात यावा.

३. प्रतिवादी नं.१ याने त्याचे म्हणणे नि.क्र.३५ वर दाखल केले असून असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३८ नियम ५ च्या व्याप्तीमध्ये बसत नसल्यामुळे फेटाळण्यास पात्र आहे. वादीने खरी वस्तुस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवून या प्रतिवादींना त्रास देण्याकरीता हा दावा दाखल केला आहे. अनामत रक्कम न्यायालयात भरायला लावुन केवळ प्रतिवादींना त्रास दयायचा आहे. अशा स्वरुपाचा अर्ज वादीने सातारा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात रे.दि.मु.नं. ३५७/२०२२ मध्ये दाखल केलेला आहे. सदर बाब वादीने या न्यायालयापासून जाणूनबुजून लपवून ठेवली आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३८ नियम ५ अन्वये दावा मिळकत न्यायनिर्णयापूर्वी जप्त करण्याची तरतुद दिलेली आहे. त्याकरीता वादीला न्यायालयास प्रतिवादी हा दावा मिळकत पूर्ण अथवा त्यातील काही भाग हस्तांतरीत करण्याच्या विचारात आहे व सदर मिळकत पूर्ण अथवा त्यातील काही भाग या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर नेण्याचा प्रयत्न करत आहे याबाबत संतुष्ट करावे लागेल. तसे केल्यास न्यायालय हे प्रतिवादीस हमी देण्याचा आदेश देवू शकते. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचे असे कथन आहे

की, प्रतिवादी नं.१ याने दावा मिळकत ही प्रतिवादी नं.३ यास विक्री केलेली आहे. परंतु त्यावरुन जर वादीच्या बाजूने हुकूमनामा झाला तर त्याला त्याची अंमलबजावणी करता येवू नये म्हणून प्रतिवादीने दावा मिळकत हस्तांतरीत केली असे दिसून येत नाही. सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३८ नियम ५ च्या व्याप्तीमध्ये कोठेही बसत नाही. तसेच तो बसतो याबाबत वादीने या न्यायालयास संतुष्ट केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि.क्र.३४) नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2024.04.06 17:29:30 +0530

स्थळ : कोरेगाव

दिनांक : ०३/०४/२०२४

( ए.ए.पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कोरेगाव.